पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/४५३/२०१०
दिनांक- ६/०५/२०१०

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ११.०५.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ११.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- १६८

दिनांक- ११.०५.२०१० वेळ- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ११.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक २७.४.२०१० व ४.५.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६६) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ४.५.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६७) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांचेकडून ३ महिने कालावधीसाठी GISDA Application चे देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करारनामा न करता व थेट पध्दतीने करून घेणेस आणि त्याकामी येणाऱ्या एकुण र.रू.६,३०,०००/- [र.रू. सहा लाख तीस हजार] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.११.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) श्री.अजय जनार्दन सुर्यवंशी यांना महापालिके मध्ये कायदा सल्लागार या पदावर ६ महिने कालावधीसाठी कोणतेही आर्थिक लाभ व सोयीसुविधा न देता फक्त र.रू.२५,०००/- [र.रू.पंचवीस हजार] मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.११.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मनपाच्या उद्यान विभागा कडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, ब प्रभागातील मनपाचे विविध उद्यानाचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस पुणे (र.रू.२=२४ पै.प्रति चौ.मी. प्रतिमहा) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.२५,३८,०००/- [र.रू.पंचवीस लाख अडोतीस हजार])
(दि.११.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मनपाच्या उद्यान विभागा कडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, ड प्रभागातील मनपाचे विविध उद्यानाचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस (र.रू.२=२५ पै.प्रति चौ.मी. प्रतिमहा) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१२,१३,०००/- [र.रू.बारा लाख तेरा हजार])
(दि.११.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१३९ अन्वये, वॉर्ड क्र.५८ रावेत येथे पवना नदी काठी घाट बांधणे (फेरनिविदा) कामी मे.आर.आर.पाटील (नि.र.रू. २८,००,२४४/- [र.रू.अठ्ठावीस लाख दोनशे चव्वेचाळीस] पेक्षा १८.०० % जास्त) (सन २००८-०९ च्या चालू दराशी तुलना करता १७.७९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.३३,०४,२८८/- [र.रू.तेहतीस लाख चार हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.११.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१९.४.२०१० ते २५.४.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४५/२०१० दि.३.५.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ७) मे.टेक ९ सर्व्हिसेस यांना सन २००९-१० चे सुधारित तसेच सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकासाठी संगणक प्रणाली तयार करणे व तत्संबंधीत कामकाज निविदा न मागविता करारनामा न करता थेट पध्दतीने करणेकामी एकूण र.रू.२,७०,०००/- [र.रू. दोन लाख सत्तर हजार] चे खर्चास व करारनामा न करता थेट पध्दतीने करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य कार्यालयातील विविध विभागांसाठी ISM Office NT ५० Users Upgrade करणे कामीची तातडीची गरज विचारात घेता निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने कामकाज करून घेणे आवश्यक असल्याने सदरचे ISM Office NT ५० Users Upgrade १ नग मे.Data Care Corporation, Pune-०४. यांचेकडून दुरुस्ती करणेस व येणाऱ्या र.रू.१०,७९१/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.१०/२००९-१० अन्वये, मनपाचे दुर्गादेवी टेकडी येथील तळ्यामध्ये मच्छिमारी करणेचे काम भाडेतत्वावर देणेकामी मे.श्रीनिवास स्वयं.सेवा सह.संस्था मर्या., पिंपरी, पुणे-१७. (प्रति वर्ष भाडे र.रू.७,२५०/- [र.रू. सात हजार दोनशे पन्नास]) या सर्वात जास्त दराचे ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१५,०००/- [र.रू.पंधरा हजार])

विषय क्रमांक- १०) मनपाच्या पीसीएमसी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लि. या कंपनीसाठी Certificate of Commencement (सर्टीफिकेट ऑफ कमेन्समेंट) प्राप्त करण्यासाठी श्री.सुधीर पैठणकर यांची सी.ए. म्हणून नेमणूक करण्यास व त्यांनी मागितलेली र.रू.२५,०००/- त्यांना अदा करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या झो.नि.पू. विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ मधील अ.क्र.९ अन्वये, वॉर्ड क्र.२५ मधील बालाजीनगर झोपडपट्टीत कॉक्रीट पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.संजय कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.२८,५६,८३५/- [र.रू. अठ्ठावीस लाख छपन्न हजार आठशे पस्तीस] पेक्षा २६.२० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. २२,१३,७६१/- [र.रू.बावीस लाख तेरा हजार सातशे एकसष्ट] पर्यंत काम करून घेण्यास त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) चिंचवड येथील वॉर्ड क्र.६७ मधील यशोपुरम सोसायटी जवळील रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था वॉर्डस्तरीय योजने मधुन करणेकामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने कमल इले.इन्ट. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९९०/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे नव्वद] पेक्षा

१% कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) चिंचवड येथील वॉर्ड क्र.३६ आनंदनगर मधील नव्याने तयार झालेल्या बालवाडी मध्ये व व्यायामशाळेमध्ये वॉर्डस्तरीय योजने मधुन विद्युतीकरण करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने कमल इले.इन्ट. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९८१/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे एक्याऐंशी] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) चिंचवड येथील वॉर्ड क्र.६८ मधील भाटनगर, रमाबाईनगर, बौध्दनगर परिसरामध्ये दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इले.कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९९०/- [र.रू. एकोणपन्नास हजार नऊशे नव्वद] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००६-०७ मधील अ.क्र.५ अन्वये, थेरगांव प्र.क्र.१५ मध्ये उर्वरित कमानी बांधणे या कामा ऐवजी थेरगांव मधील विविध स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.जयगणेश एंटरप्रायजेस (नि.र.रू. ४,१६,२२३/- [र.रू.चार लाख सोळा हजार दोनशे तेवीस] पेक्षा २५ % जास्त) (सन ०८-०९ चे दरसुचीशी तुलना करता १२.७८ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४० नुसार, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस, इक्विपमेंट्स, चिंचवड, पुणे- १९ व मे.वरदायिनि एन्टरप्रायझेस, चिंचवड, पुणे १९ यांचे नावापुढे नमुद केलेल्या तलावांची पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे प्रस्तावात नमुद केलेले दरांस (मासिक दर अ.क्र.१ ते ८ तलाव एकुण र.रु.६,४४,०००/-) व पिंपळे गुरव जलतरण तलाव नवीन असल्याने, या तलावाच्या कामाचे दर मंजुर नसल्याने, या तलावाची पाणी साठविण्याची क्षमता मोहननगर,चिंचवड जलतरण तलावा इतकीच (१० लाख लिटर्स) असल्याने, त्या तलावांच्या दराने र.रु.८५,०००/- मासिक दरांप्रमाणे पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक

देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेण्यास व याकामाचे संबंधित ठेकेदारांकडुन एक वर्षाचा करारनामा करुन घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १७) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४१ नुसार, म.न.पा.ची स्वा.सावरकर व्यायामशाळा निगडी (प्राधिकरण) सेवाशुल्क तत्वावर वनिता मंडळ, निगडी (प्राधिकरण) या संस्थेस चालविण्यास द्यावयाची की शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास द्यावयाची याबाबत फेरविचार करून शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १८) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४२ नुसार, मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून घेणेकामी क्रिडा विभागा कडून कोटेशन नोटीस प्रसिध्द करूनही यास प्रतिसाद मिळालेला नाही. मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून मिळणेबाबत नागरीक व मा.नगरसदस्य सतत मागणी करीत असतात. तरी नि.नो.क्र.२/२००७-०८ चे मंजूर दरांनुसार मे.गिनिज स्पोर्टस, पुणे-२६ यांचेकडून विहीत नमुन्यात २ वर्षाचा करारनामा करून आवश्यक अनामत रकमेचा एफ.डी.आर. घेऊन मनपा व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रू.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १९) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४३ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मनपा परिसरात महापौर चषक जिल्हास्तरीय क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २०) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४४ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने स्व.राजेश बहल स्पोर्ट्‌स ॲन्ड सोशल फाऊंडेशन, संत तुकाराम नगर, पिंपरी-१८. यांच्या सहकार्याने व पुणे जिल्हा फुटबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने दि.२८ मे २०१० ते ६ जुन २०१० या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी-१८ येथे महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २१) मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४७ नुसार, महापालिका हद्दीतील युवतींना यो.क्र.५ अन्वये इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S), अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्चशिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ७० लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१०,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.७,००,०००/- अदा करणेस (तसेच अपात्र अर्जदारांपैकी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर पात्र ठरणा-या अर्जदारास प्रत्येकी र.रु.१०,०००/- अर्थसहाय्य अदा करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास ) मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/४५३/२०१०
दिनांक : ६/०५/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.